महाराष्ट्र शासन
**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
शिवछत्रपती क्रीडापीठ म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे-४११ ०४५.
ई-मेल: dsysdesk९@gmail.com & desk९.dsys-mh@gov.in फोन नं. :- ०२० - २७३९०८७३

क्र.जिक्रीसं/सुप्रमा/२४-२५/का-९ / 702 दिनांक - 21 JUN 2024

प्रति,

विभागीय उपसंचालक, सबंधित.

जिल्हा क्रीडा अधिकारी, सबंधित.

**विषय** :- विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल बांधकाम सुधारित/अतिरिक्त अंदाजपत्रक व आराखडयांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

**संदर्भ** :- १. शासन निर्णय क्रं.राक्रीधो-२०१९/प्र.क्र.९२/क्रीयुसे-१, दि.२३.०३.२०२२.
२.शासन पत्रक्र.बैठक ३०२४/प्र.क्र.७०/क्रीयुसे-१, दि.१३.०६.२०२४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ शासन निर्णयान्वये विभागीय व जिल्हा क्रीडा संकुलाची अनुदान मर्यादेत वाढ झालेली आहे. यानुषंगाने सोबतच्या विभागीय व जिल्हा क्रीडा संकुलांची सुधारीत अंदाजपत्रके व आराखडे आपणाकडुन मान्यतेस्तव प्राप्त झाली आहेत.

राज्य क्रीडा विकास समितीची दि.०६.०३.२०२४ रोजी बैठकीत विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीद्वारे प्राप्त झालेली अंदाजपत्रके व आराखडे सादर करण्यात आली असता, संदर्भीय क्र.२ अन्वये सोबतच्या विभागीय/जिल्हा क्रीडा संकुलांच्या बांधकामाच्या सुधारित अंदाजपत्रक व आराखडयांना मान्यता दिली आहे. **(सोबत परिशिष्ट - अ पहावे.)** व सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेले निर्णय खालील प्रमाणे -

१) सदर बैठकीमध्ये विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलांच्या सादर केलेल्या प्रस्तावाबाबत संकुलनिहाय चर्चा करण्यात आली. या चर्चेदरम्यान असे निदर्शनास आले की, बऱ्याच क्रीडा संकुलांच्या अंदाजपत्रकाची रक्कम ही प्रचलित शासन निर्णयातील अनुदान मर्यादेपेक्षा जास्त आहे.

२) प्रचलित शासन निर्णयातील अनुदान मर्यादेच्या बाहेरील क्रीडा संकुलांच्या प्रस्तावांची क्रीडा संचालनालयाने सविस्तर छाननी करून शासन अनुदान मर्यादेत बसणा-या बाबी व अनुदान मर्यादेच्या बाहेर जाण-या बाबी असे क्रीडा संकुलनिहाय वर्गीकरण करावे.

३) उपरोक्त वर्गीकरणानूसार शासन अनुदान मर्यादेत असणा-या क्रीडा संकुलाच्या प्रस्तावांना राज्य क्रीडा विकास समितीची प्रशासकीय मान्यता देण्यात यावी व शासन अनुदान मर्यादेच्या बाहेर जाणा-या बाबींचे अंदाजपत्रक राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावे.

४) तद्नुषंगाने समितीपुढे सादर करण्यात आलेल्या परिशिष्ट-अ, मध्ये नमूद क्रीडा संकुलांच्या अंदाजपत्रक आराखडयांच्या प्रस्तावांना संकुलाच्या नावासमोर देण्यात आलेल्या अभिप्रायानूसार मान्यता देण्यात आली. सदर मान्यता हि विहित टाईप प्लॅनच्या व आवश्यकतेच्या अधीन राहून देण्यात आली.

उपरोक्त विभाग व जिल्हा क्रीडा संकुलांचे बांधकामे सुरू करण्याकरिता खालीलप्रमाणे निर्देश नमुद आहेत.

१. संबंधित संकुल समितीने शासन देय अनुदानाच्या मर्यादेत प्राधन्याने आवश्यक क्रीडा सुविधा निर्माण करुन स्थानिक खेळाडू व नागरिकांना उपलब्ध करुन द्याव्यात तद्नंतर शिल्लक शासन अनुदानाच्या

मर्यादेत व समितीच्या स्वबळावर उपलब्ध तरतुदीच्या आधीन राहुन इतर क्रीडा सुविधा निर्माण करावयात.

२. संबंधित क्रीडा संकुल समितीने क्रीडा संकुलाचे बांधकाम करताना किंवा करणेपूर्वी सदर अदांजपत्रक व आराखडे सा.बां. विभागाचे आर्किटेक्ट यांचेकडून तपासून घेणे.

३. नव्याने बांधकाम करताना स्थानिक विकास नियमानूसार व स्थानिक प्राधिकरणच्या पूर्वमंजुरी नंतर बांधकाम करण्यात यावे.

४. बांधकाम करताना किंवा करणेपूर्वी सदर अदांजपत्रक व आराखडे सा.बां. विभागाच्या बांधकाम मॅन्युअलच्या आधारेच (सुरक्षा उपायासह) आहेत, याबाबत सा.बां. विभागाचे आर्किटेक्ट यांचेकडून तपासून घेणे.

५. क्रीडा संकुल निविदा प्रक्रिया करताना एक्सलेशन क्लॉज व अन्य अटी मान्य करण्यात येऊ नये.

६. क्रीडा संकुलात एका वेळेस एकच क्रीडा सुविधेचे काम हाती घेण्यात यावे व ते प्राथाम्याने पूर्ण करण्यात यावे. तदनंतर दुसरे काम हाती घेण्यात यावे. बांधकाम निविदा व कार्यारंभ आदेशाच्या प्रती संचालनालयास माहितीसाठी पाठवाव्यात.

७. क्रीडा संकुलातील कामे निविदा शर्तीनुसार विहित केल्याप्रमाणे मुदतीत पूर्ण करावीत.

८. क्रीडा संकुलातील क्रीडा सुविधेची निर्मिती ही त्यात्या खेळाच्या सुधारीत मापदंडाप्रमाणे करण्याची जबाबदारी क्रीडा संकुल समितीची राहील.

९. बांधकाम खर्चात वाढ झाल्यास शासन अनुदानाव्यतिरिक्त येणारा वाढीव खर्च हा संकुल समितीने स्वबळावर उभारून वाढीव खर्च भागवावा.

१०. संकुलामध्ये आपत्कालिन प्रसंगाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या उपाययोजना जसे सुरक्षा व्यवस्था, अग्निशामक व्यवस्था, प्रथमोपचर, अपंगाकरिता खास (रॅम्प) व्यवस्था, सीसीटीव्ही, आपत्कालिन प्रवेशद्वार. इ. पूर्ण करण्याची जबाबदारी ही संबंधित क्रीडा संकुल समितीची राहील. उभारण्यात येणा-या क्रीडा सुविधा व आनुषंगिक बाबींची नोंद मत्ता लेखे नोंदवही (Asset Register) मध्ये नोंदविण्यात यावी.

११. त्याचप्रमाणे बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडीट, वेळोवेळी बांधकाम साहित्याची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी व त्याचा अहवाल जतन करून ठेवावा.

१२. बांधकामाचा प्रगती व खर्चाचा अहवाल वेळोवेळी सादर करावा. तसेच बांधकाम पुर्ण होताच अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र, बांधकामाचे फोटो, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला यासह संचालनालयास सादर करावे.

(सुधीर मोरे) 21/6/15

सहसंचालक,

क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य.

**प्रत माहितीस्तव सादर** –

१) मा.पालकमंत्री तथा अध्यक्ष विभगीय/जिल्हा क्रीडा संकुल समिती (संबंधित) (वि.उप. व जि.क्री. अ.,यांच्या मार्फत)
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई.३२
३) मा. उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई.३२
४) विभागीय उपसंचालक क्रीडा व युवकसेवा (संबंधित)

## परिशिष्ट - अ

### विभागीय व जिल्हा क्रीडा संकुलांच्या बांधकामाकरिता सुधारित/अतिरिक्त अंदाजपत्रक व आराखडयांना प्रशासकीय मान्यता मंजुरीबाबत..

(रु.लाखात)

| अक्र | क्रीडा संकुलाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम व क्रीडा सुविधा बाब |
|---|---|---|
| १. | विभागीय क्रीडा संकुल, नागपूर जि. नागपूर | • सदर संकुलाचे रु. ६८३७९.३५ लक्ष अंदाजपत्रक सादर केले आहे त्यामध्ये पूर्वीचा हॉल दुरूस्ती व अद्यावरीकरण, स्पोर्टस कल्ब ( ७ मजली, २५ क्युव रूम्स), ॲथलेटिक्स बिल्डींग (G+२), मुला-मुलींचे हॉस्टेल(G+७), जिम्नॅशियम इमारत प्रेक्षक गॅलरीसह (G+१), प्रशासकीय इमारत प्रेक्षक गॅलरीसह (G+१), स्पोर्टस स्कूल (G+५), स्पोर्टस युनिर्व्हसिटी (G+५), कन्व्हेशनल सेंटर(G+३), स्पोर्टस म्युझियम, कॅन्टीन, फूटबॉल मैदानाकरिता पॅव्हेलियन इमारत (G+१), हॉकी मैदानाकरिता पॅव्हेलियन इमारत (G+१), जलतरण तलाव, डायव्हिंग पूलसह, स्कॅवश कोर्ट, सिंथेटिक टेनिस ७ कोर्ट, खो-खो दोन मैदान, कबड्डी दोन मैदान, बास्केटबॉल दोन मैदान, सॉफ्टबॉल मैदान, आर्चरी ( १० लेन्स x ९० मी. ), फूटबॉल मैदान, अंतर्गत रस्ते, मैदान विकसित करणे व लॅण्डस्केपिंग, पाणी व्यवस्था, फर्निचर, विद्युत व्यवस्था, फायर फायटींग, वॉटर हार्व्हेस्टींग, सोलर व्यवस्था, सी.सी.टिव्ही, लिफ्ट्स. कुलिंग व्यवस्था, व्यायामसाहित्य, स्विमींग पूल सहित्य, रिटेनिंग वॉल, ड्रेनेज व्यवस्था, पार्किंग, व इतर खर्च इ. समावेश आहे.<br>• राज्य मंत्री मंडळाच्या दि. १५.२.२०२४ रोजीच्या बैठकी मध्ये नागपूर येथील विभागीय क्रीडा संकुलास राज्य क्रीडा संकुलाचा दर्जा देण्यात आलेला आहे. या क्रीडा संकुला साठी यापूर्वी रू. ५१.२० कोटी निधी देण्यात आलेला असून ६८३.७९ कोटी सुधारीत अंदाजपत्रक विचारात घेऊन रू. ७४६.९९ कोटीच्या सुधारीत अंदाजपत्रकास /खर्चास मान्यता देण्यात आली आहे.<br>• विभागीय क्रीडा संकुलास राज्य मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झाल्याची बाब राज्य क्रीडा विकास समितीच्या निदर्शनास आणुन देण्यात आली.<br>• सुधारित अंदाजपत्रकात अंतर्भूत असलेल्या विविध कामापैकी इमारत बांधकामे व क्रीडा सुविधांबाबत प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेऊन विहीत कार्यपध्दतींचा अवलंब करून पुढील कार्यवाही करण्याबाबत ठरले. |
| २. | जिल्हा क्रीडा संकुल, परभणी जि.परभणी | • यापूर्वी सदर क्रीडा संकुलास रू. ७९९.४९ लक्षची प्रशासकीय मान्यता देऊन रू. ७९९.४९ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला.<br>• सदर संकुलामधील कार्यालयीन इमारत व बॉक्सिंग हॉलचे बांधकाम सन १९७३-७४ या कालावधीत झालेले आहे. सदर इमारतीचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड यांनी केलेल्या स्ट्रक्चरल ऑडीट नुसार इमारतीची नुतनीकरण / दुरूस्ती होणे आवश्यक असून रु. १५८८.९२ लक्ष संकुल दुरूस्ती व अद्ययावतीकरणाचे अंदाजपत्रक सादर केले असुन त्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे :-<br>१) ॲथलेटिक्स पॅव्हेलियन इमारत रूफींग शिट बसविणे, पॅव्हेलियन इमारत आतून व बाहेरून रंगरंगोटी करणे, स्वच्छतागृह व प्रसाधनगृह दुरूस्ती व अद्यावत करणे, महोत्सव हॉल नुतनीकरण,<br>२) जिल्हा क्रीडा कार्यालय नुतनीकरण, रूम एरिया, विद्युती फिटींग दुरूस्ती, पाणी पाईप लाईन दुरूस्ती, सी.सी.टी.व्ही बसविणे, फायर फायटींग व्यवस्था, सद्य असलेले ४०० मी. धावनपथ ( ४ लेन मातीचा, डि एरिया व आतील भाग, आतील ड्रेन व्यवस्था, आर. आर. सी. कर्व भिंत, विद्युत व्यवस्था ),<br>३) सद्य असलेले बहुउद्देशिय हॉल अद्यावतीकरण ( रंगरंगोटी, वुडन फ्लोरींग करणे, सिंथेटिक मॅटीग करणे, दरवाजा, खिडक्या |

| अक्र | क्रीडा संकुलाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम व क्रीडा सुविधा बाब |
|---|---|---|
| | | स्वच्छतागृहाच्या बदलणे, चेंजिंग रूम व बाथरूमच्या टाईल्स बदलणे. विद्युत व्यवस्था दुरूस्ती, फॅन बसविने, फायर फायटींग व्यवस्था, पाणी पाईप लाईन दुरूस्ती, सोलर व्यवस्था करणे, इ.),<br>४) सद्य असलेले वसतिगृह अद्यावतीकरण ( डॉमेट्रीज फ्लोरिंग, टॉयलेट फ्लोरिंग, फर्निचर खरेदी, रूफींग बदलणे, विद्युत व्यवस्था दुरूस्ती, फॅन बसविणे, फायर फायटींग व्यवस्था, पाणी पाईप लाईन दुरूस्ती, सि.सी.टीव्ही बसविणे इ.)<br>५) सध्याअस्तित्वात असलेल्या बॉक्सिंग हॉलचे अद्यावतीकरण (रूफींग बदलणे, रंगरंगोटी करणे, सेलिंग करणे, फ्लोरिंग, प्रसाधनगृह, ऑफिस, स्वच्छतागृह दुरूस्ती, रूफटॉप टार्बो वेन्टिलेशन, विद्युत व्यवस्था, फॅन, सीसीटिव्ही, फायर इ.) व इतर खर्च समावेश आहे.<br>• सदर क्रीडा संकुल समितीस शासन अनुदान मर्यादा रू. २३००.०० लक्ष विचारात घेऊन यापूर्वी झालेला खर्च रू. ७९९.४९ लक्ष व प्राप्त झालेले सुधारीत अंदाजपत्रकापैकी रू. १५००.५१ लक्ष असे एकूण मिळून रू. २३००.०० लक्षच्या मर्यादेत अंदाजपत्रक व आराखड्यास विहीत टाइप प्लॅन व आवश्यकतेच्या अधीन राहून सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. |
| ३. | जिल्हा क्रीडा संकुल, अमरावती, जि. अमरावती | • सदर क्रीडा संकुलास यापूर्वी रु. १४३२.७६ लक्षच्या अंदाजपत्रक आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. याकरिता शासन अनुज्ञेयअनुदानापैकी रू. ११३१.०३ लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला असून यामध्ये मुख्य प्रशासकीय इमारत, भूमिगत पाणी टाकी, अंतर्गत रस्ते, संरक्षक भिंत व प्रवेशद्वार, विद्युतीकरण इ. कामे पूर्ण असून नागरिक व खेळाडूकरिता वापर सुरू आहे. आर्चरी रेंजचे काम खेलो इंडिया योजनेतून काम पूर्ण झालेले आहे.<br>• जिल्हा क्रीडा संकुलाचे रु.२८७७.७१ लक्ष अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे.<br>• सदर क्रीडा संकुल समितीने प्रथम टप्प्यात रू. ११८८.४६ लक्ष चे सुधारीत अंदाजपत्रक सादर केले असून यामध्ये मुला-मुलींचे वसतिगृह (तळमजला), खो-खो २ मैदान, कबड्डी २ मैदाने, व्हॉलीबॉल २ कोर्ट, आंतरराष्ट्रीय स्केटींग रिंग, (आरसीसी ड्रेनेजसह), नवीन इनडोअर हॉलला कुलिंग व ॲकेस्टिक व्यवस्था, वसतिगृह फर्निचर, ओव्हर हेड टाकी व इतर खर्च समावेश आहे.<br>• सदर जिल्हा क्रीडा संकुलास यापूर्वी दिलेलीरू. १४३२.७६ लक्ष प्रशासकीय मान्यतेपैकी रू.११३१.०३ लक्ष निधीची कामे पुर्ण झाली आहेत. सदर बाब विचारात घेऊन उर्वरित रू. ३०१.७३ लक्ष किंमतीच्या कामांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात येत असून अनुज्ञेय शासन अनुदान रू. २३००.०० (११३१.०३+११६८.९७) लक्ष च्या मर्यादेत अंदाजपत्रक व आराखड्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.<br>• सदर संकुल समितीने दुस-या टप्प्यात रु. १७७९.११ लक्षचे अतिरिक्त अंदाजपत्रक सादर केले असुन त्यामध्ये, वसतिगृह ( दुसरा व तिसरा मजला ), ज्युडो व स्क्वॅश कोर्ट हॉल अद्यावतीकरण, पार्किंग व्यवस्था, आर्चरी रेंज कार्यालय इमारतीच्या वरती प्रेक्षक गॅलरीला शेड करणे, आर्चरी रेंज करिता प्रेक्षक गॅलरी (५०० आसन क्षमता) शेड करणे, आर्चरी रेंजला चेंजलिंग फेन्सिंग करणे, अंतर्गत रस्ते,विद्युत व्यवस्था, ओव्हर हेड पाण्याची टाकी, व पिण्याचे पाण्याची व्यवस्था, क्रीडा साहित्य,सोलर व्यवस्था, सुशोभिकरण व्यवस्था व इतर खर्च समावेश आहे.<br>• सदरक्रीडासंकुलातील वाढीव बाबींचे प्रस्तावित अंदाजपत्रक रू.१७७९.११ लक्ष हे शासन अनुदान मर्यादेच्या बाहेर जात असल्याने याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य मंत्रिमंडळासमोर ठेवणे आवश्यक राहील. |
| ४. | जिल्हा क्रीडा संकुल, यवतमाळ, जि. | • संकुल समितीने रु.११९१.९० लक्ष चे अंदाजपत्रक सादर केले असुन त्यामध्ये मुले-मुलीचे वसतिगृह अद्ययावतीकरण व विस्तारीकरण ( दुसरा मजला ), हॉकी ॲस्टोटर्फ ग्राऊंड, रेनवॉटर हार्वेस्टींग, क्रीडा साहित्य, विद्युतीकरण, पाण्याची व्यवस्था, व इ. खर्च समावेश आहे. |

| अक्र | क्रीडा संकुलाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम व क्रीडा सुविधा बाब |
|---|---|---|
| | यवतमाळ | • सदर क्रीडा संकुल समितीस यापुर्वीच्या व सुधारित अनुदान मर्यादेप्रमाणे शासन अनुदान मर्यादा रू. २३००.०० लक्ष विचारात घेऊन यापूर्वी झालेला खर्च रू. ८००.०० लक्ष व प्राप्त झालेले सुधारीत अंदाजपत्रक रू. ११९१.९० लक्ष असे एकूण मिळून रू. १९९१.९० लक्षच्या अंदाजपत्रक आराखड्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. |
| ५. | जिल्हा क्रीडा संकुलनंदुरबार ,, जि.नंदुरवार | • जिल्हा क्रीडा संकुलाचे रु.४१३३.४६ लक्ष अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे.<br>• सदर संकुलामध्ये प्रथम टप्प्या रू.१५००.०० लक्षचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून यामध्ये कार्यालयीन इमारत, नविन वसतीगृह बांधणे, इनडोअर हॉल दुरुस्ती, शुटींग रेंज हॉल दुरुस्ती, विविध खेळाची मैदाने दुरुस्ती करणे, नविन खेळाची मैदाने तयार करणे, विद्युतीकरण, पेव्हर्स ब्लॉक, पार्किंग, रेन वॉटर हार्वेस्टींग, पाणी पुरवठा व ड्रेनेज व्यवस्था, फर्निचर व इतर खर्च इ. समावेश आहे.<br>• सबब, सदर क्रीडा संकुल समितीस शासन अनुदान मर्यादा रू. २३००.०० लक्ष विचारात घेऊन यापूर्वी झालेला खर्च रू. ८००.०० लक्ष व सुधारीत रू. १५००.०० लक्ष असे एकूण मिळून रू.२३००.०० लक्षच्या मर्यादेत अंदाजपत्रक आराखड्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.<br>• तसेचसदरक्रीडा संकुलाचे दुस-या टप्प्यामध्ये रु. २६३४.०० लक्ष अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून यामध्ये विविध खेळासाठी नविन बहुउदेशिय हॉल करणे, पॅव्हेलियन, ४०० मी सिंथेटिक ट्रॅक करणे, विद्युतीकरण, अंतर्गत रस्ते, जलतरण तलाव, फुटबॉल मैदान, वास्तुविशारद फी, कामगार विमा व इ. समावेश आहे.<br>• सदर क्रीडा संकुलातील वाढीव बाबींचे प्रस्तावित अंदाजपत्रक रू. २६३४.०० लक्ष हे शासन अनुदान मर्यादेच्या बाहेर जात असल्याने याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य मंत्रिमंडळासमोर ठेवणे आवश्यक आहे. तपासून पुढील कार्यवाही करावी. |
| ६. | जिल्हा क्रीडा संकुल, लातूर, जि. लातूर | • सदर संकुलामध्येप्रथम टप्प्यात रू.१४९६.६१ लक्षचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून यामध्ये ४०० मी. ०९ लेनसचा धावनमार्ग उंच उडी, तिहेरी उडी, हातोडा फेक, थाळीफेक, गोळाफेक, भालाफेक, फुटबॉल टर्फ मैदान, ड्रेनेजसिस्टीम,साहित्य अंडरग्राऊंड पाण्याची टाकी ट्रीटमेंट एरिया व इतर खर्च इ. समावेश आहे.<br>• सबब, यापूर्वी झालेला खर्च रू. ८००.०० लक्ष व सुधारीत रू.१४९६.६१ लक्ष अंदाजपत्रक असे एकूण रू. २२९७.६१ लक्षच्या अंदाजपत्रक आराखड्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. |
| ७. | जिल्हा क्रीडा संकुल, अहमदनगर, जि. अहमदनगर | • जिल्हा क्रीडा संकुलाचे रु. ५११७.२५ लक्षचे अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार या अंदाजपत्रकाचे वर्गीकरण करुन प्रथम टप्प्या मध्ये रु. १५६९.५२ लक्ष इतका अंदाजित खर्च असून त्यामध्ये ४०० मी. सिंथेटिक ट्रॅक, क्रिकेट ग्राऊंड लॉन, स्टेडियमकरिता स्प्रिंकल सिस्टीम करणे, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल मैदानांचे डोम रूफ, ग्राऊंड व इतर खर्च याबाबींचासमावेश आहे.<br>• सबब, यापूर्वी झालेला खर्च रू.८००.०० लक्ष व सुधारीत रू.१५६९.५२ लक्ष अंदाजपत्रका पैकी सदर क्रीडा संकुल समितीस शासन अनुदान मर्यादा विचारात घेता रू.२३००.०० लक्षच्या मर्यादेत अंदाजपत्रक आराखड्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.<br>• सदर क्रीडा संकुलाच्या दुस-या टप्प्यामध्ये रू. ३५४७.७३ लक्षचे अंदाजपत्रकामध्ये त्यामध्ये स्टेडियममधील प्रेक्षकगॅलरीस रूफींग करणे, स्वच्छतागृह दुरूस्ती, रेनवॉटर, बॅडमिंटन हॉल अद्यावतीकरण ( वुडन फ्लोरिंग करणे, स्वच्छतागृह,सोना व स्टीम बाथ व्यवस्था, ऑकेस्टिक व्यवस्था ), वसतिगृह ( दुसरा मजला बांधकाम, पेव्हर ब्लॉक संपूर्ण इमारत, रूममधील अंतर्गत कामे ), जलतरण तलाव अद्यावतीकरण ( |

| अक्र | क्रीडा संकुलाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम व क्रीडा सुविधा बाब |
|---|---|---|
| | | फिल्ट्रेशन प्लांट दुरूस्ती, वेट जिम ट्रेनिंग हॉल, स्वच्छतागृह, अंतर्गत व बाह्य रंगरंगोटी, प्रेक्षक गॅलरी रूफींग, पार्किंग एरियामध्ये पेव्हर ब्लॉक, टू व फोर व्हिलर पार्किंग शेड करणे, स्वागत कक्ष अंतर्गत कामे ), कुस्ती व बॉक्सिंग हॉल बांधकाम, कुस्ती तालीम अद्ययावतीकरण व नवनिर्मिती ( दुमजली बांधकाम - तळमजला कुस्ती हौद, पहिला मजला- कुस्ती मॅट हॉल, दुसरा मजला - बॉक्सिंग हॉल ) कबड्डी व खोख- मैदानांचे अद्ययावतीकरण, डोम रूफ व स्वच्छतागृह बांधकाम, २ सिंथेटिक टेनिस कोर्ट तयार करणे, सीसी रोड ( एन व़ॉटर गटर व्यवस्था, विद्युतीकरण अंतर्गत व बाह्य, डेनेज लाईन व्यवस्था, पाणी लाईन व्यवस्था, रूफ टॉप सोलर पॅनल व्यवस्था( स्टेडियम, बॅडमिंटन हॉल, वसतिगृह, जलतरण तलाव, कुस्ती हॉल, इ. ) व इतर<br>• सदर क्रीडा संकुलातील वाढीव बाबींचे प्रस्तावित अंदाजपत्रक रू.३५४७.७३ लक्ष हे शासन अनुदान मर्यादेच्या बाहेर जात असल्याने याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य मंत्रिमंडळासमोर ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आवश्यकता तपासून पुढील कार्यवाही करावी. |
| ८. | जिल्हा क्रीडा संकुल, गोंदिया, जि. गोंदिया | • सदर संकुलास यापूर्वी रू.२२३१.६८ लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येऊन रु. २२३१.६८ लक्ष इतकानिधीटप्प्याटप्प्याने वितरीत करण्यात आलेला आहे. प्राप्तअनुदानातून पॅव्हेलियन बिल्डींग, ४०० मी धावनपथ, विविध खेळाची मैदाने, जलतरण तलाव, इनडोअर हॉल, वसतिगृह, ड्रेनेज, पाणी पुरवठा, विद्युतीकरण, अंतर्गत रस्ते, सरंक्षक भिंत व इतर खर्च इ. क्रीडा सुविधा पूर्ण झालेल्या असून वापर सुरू आहे.<br>• शासन निर्णयातील अनुदान मर्यादेनूसार सदर संकुलास रू. २३००.०० लक्ष इतकीअनुदान मर्यादा आहे. त्यापैकी रू. २२३१.६८ लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला असून निधी पूर्णपणे खर्च झालेला आहे. शिल्लक देय रक्कम रू. ६८.३२ लक्ष इतकी आहे.<br>• जिल्हाक्रीडासंकुल समितीने दुस-या टप्प्यात रु.१३८२.३२ लक्षचे अतिरिक्त अंदाजपत्रक सादर केले असुन त्यामध्ये ४०० मी.सिंथेटिक धावनपथ, जलतरण तलाव दुरूस्ती इ. बाबींचा समावेश आहे.<br>• सदर क्रीडा संकुलासाठी यापुर्वी तत्कालीन अनुदान मर्यादेपेक्षा जास्तीच्या अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे व त्यानुसार अनुदान मर्यादेपेक्षा अधिकचा निधी वितरीत केला आहे. सदर कार्यवाहीस मा.मंत्रीमंडळाची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच, वरीलप्रमाणे सुधारित अनुदान मर्यादेपेक्षा जास्त किंमतीचे प्रस्तावित अंदाजपत्रक रू. १३८२.३२ लक्ष हे शासन अनुदान मर्यादेपेक्षा जास्त असल्याने याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य मंत्रिमंडळासमोर ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आवश्यकता तपासून पुढील कार्यवाही करावी. |